दिव्य मराठी भुसावळ 03-08-2026

पालकांना सायबर सुरक्षेचे धडे भालोद येथे उपक्रमास प्रतिसाद

प्रतिनिधी | यावल

भालोद येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमांतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रम पार पडला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व क्विक हील फाउंडेशनने आयोजित या पालक सभेत दैनंदिन जीवनात सायबर नियमांचे पालन, ऑनलाइन फसवणुकीपासून स्वत:चे रक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले.

आर. एस. जावळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यापीठाच्या विद्यार्थी स्वयंसेवक टीना पाटील आणि दर्शना चौधरी यांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन करून पालकांच्या शंकांचे निरसन केले. व्यासपीठावर पर्यवेक्षक बी. एन. पाटील, ज्येष्ठ शिक्षक डी. एस. सुरवाडे, एम. एस. जाधव व एस. एम. तायडे उपस्थित होते. सूत्रसंचालन अर्चना इंगळे यांनी तर आभार डी. एस. आमोदकर यांनी मानले.